अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# स्वस्तातली घरे ही सरकारचीच अफवा

स्वस्त घराच्या अफवेने सगळे मंत्रालय दणाणून गेले होते. पवई इथल्या हिरानंदानी इस्टेटच्या जागेवर आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरे देण्याचा न्यायालयाने आदेश दिला आहे आणि आता महाराष्ट्र सरकार केवळ ५४ हजारांमध्ये इथे घरे देणार असल्याची जोरदार अफवा पसरवली आणि बघता बघता हजारो अर्ज विकले गेले. एवढेच नव्हे तर, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या दालनामध्ये हे अर्ज दाखलही झाले. नंतर त्याचा थेट मुख्यमंत्र्यांनाच खुलासा करावा लागला आणि अशी स्वस्तातली घरे देण्याची कोणतीही योजना नसल्याचे सांगितले गेले. तसे पाहिले तर मुख्यमंत्र्यांच्या या विधानामध्ये फार मोठे सत्य दडलेले आहे. त्यांनी मंत्रालयात पसरलेल्या अफवेचा खुलासा करताना हे विधान केले असले तरी, सामान्य माणसासाठी स्वस्तातली घरे हे राज्य सरकारने पसरवलेली कायमची अफवा ठरली आहे. प्रामुख्याने मुंबईसारख्या महानगरात सामान्य माणसाला घर घेणे आता ताकदीपलिकडे गेले आहे. ज्याचे महिन्याला किमान एक लाख रुपये उत्पन्न आहे तीच व्यक्ती मुंबईत नव्याने घर घेऊ शकते. अगदी सरकारचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाची म्हणजेच म्हाडाची घरे किंवा नव्या मुंबईतल्या सिडकोची घरे विकत घेणेसुध्दा सामान्य माणसाला शक्य राहिलेले नाही. म्हाडाची निर्मिती करताना सर्वसामान्य माणसाला परवडतील अशा दरात घरे देण्याचा उद्देश होता. परंतु आता ते सुध्दा शक्य राहिलेले नाही. विशेष म्हणजे, म्हाडाची घरेसुध्दा खोटी कागदपत्रे सादर करून अनेक श्रीमंतच घरे लाटत असल्याचे दिसून येते. म्हाडाच्या मालकीचे भूखंडसुध्दा बिल्डरांच्या घशात घातले जात आहेत. जी परिस्थिती मुंबईची आहे तीच परिस्थिती राज्यातील इतर मोठ्या शहरांची आहे. स्वस्तातली घरे बांधता यावी म्हणून राज्य सरकारने नागरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द केला. या कायद्याच्या अंतर्गत लाखो एकर जमीन सरकारला आपल्या ताब्यात घेता आली असती. परंतु बड्या भांडवलदाराच्या तिजोरीला धक्का लागणार नाही याची काळजी घेतली गेली. मुंबईतसुध्दा बड्या उद्योजकांकडे असलेली जमीन सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकली नाही. उलट सरकारी मालकीचे अनेक भूखंड बिल्डरांना आणि अनेक कारखानदारांना सवलतीच्या दरात दिले गेले.

### शेतकऱ्यांच्या जमिनी घेता उद्योगपतींच्या का नाही

सरकारचा हा दुटप्पीपणा सामान्य माणसाचा घात करणारा ठरणार आहे. जे काम सरकारला सहज करता येऊ शकते आणि ज्यातून अक्षरश: लाखो घरे सामान्य माणसाला देता येऊ शकतात, ते करायलादेखील सरकारने आपली उदासीनता दाखवून दिली. याचे अत्यंत ताजे आणि संतापजनक उदाहरण म्हणजे गिरणी कामगारांना घरे देण्यात सरकारने केलेली अक्षम्य टाळाटाळ म्हणावी लागेल. मुंबई हे महानगर गिरणी उद्योगामुळे जगभर गाजत होते. मुंबईच्या औद्योगिक आणि सामाजिक विकासामध्ये इथल्या गिरणी कामगारांचा मोठा सहभाग होता. संपामुळे इथल्या गिरणी कामगारांची अक्षरश: वाताहत झाली. बेकारीच्या खाईत लोटलेल्या गिरणी कामगारांना निदान त्यांचे हक्काचे घर मिळावे अशी सातत्याने मागणी केली गेली. या सामान्य गिरणी कामगाराला सरकारने तब्बल ३० वर्ष झुलवत ठेवले. गिरणी मालकांकडे असलेली अतिरिक्त जमीन ताब्यात घ्यायलाही सरकारने कुचराई केली. बड्या उद्योगपतींचा तोटा होऊ नये या एकाच उद्देशाने गिरणी कामगारांना घरे मिळू शकली नाहीत. यावरून सरकारचा हेतू चांगला नव्हता हे सिध्द होते. अजूनही पैसेवाल्यांपुढे आणि भांडवलांदारापुढे लोटांगण घालण्याचेच काम सरकार करत आहे. आश्वासने देऊन ही मुंबईत स्वस्तातली म्हणण्यापेक्षा परवडणारी घरे बांधली गेलेली नाही. कारण सरकारला सामान्यांना दिलासा मिळेल अशी कामे करायची नाहीत. म्हणूनच ज्यावेळेला अफवेच्या स्वरुपात का असेना, स्वस्तातल्या घराची बातमी पसरते त्यावेळेला लोकांची झुंबड उडणे स्वाभाविक ठरते. म्हणून आमचे असे स्पष्ट मत आहे की, अनेक वर्षांपासून स्वस्तातली घरे ही सरकारने पसरवलेली अफवा आहे. तिला प्रत्यक्षात आणायचे असेल तर सत्ताधाऱ्यांनाच वठणीवर आणावे लागेल. बड्या उद्योजकांकडे पडून असलेल्या जमिनी ताब्यात घेण्यास भाग पाडावे लागेल. अन्यथा इंदू मिलच्या आंदोलनाप्रमाणे या जागांचा कब्जा घेण्याचे काम जनतेला करावे लागेल.

### गोदरेजकडेही अतिरिक्त जमीन

केवढी आश्चर्याची गोष्ट आहे. सामान्य माणसाला चार फुटांची जागा सरकार सवलती देऊ शकत नाही. पण उद्योगांच्या आणि कारखान्यांच्या उभारणीच्या नावाखाली सामान्य शेतकऱ्यांची लाखो एकर जमीन सक्तीने ताब्यात घेतली जाते. आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना पोलिसांच्या बळाचा वापर करून त्रास दिला जातो. पण इकडे लाखो एकर जमीन ज्या उद्योगपतींकडे पडून आहे त्यांच्या केसालाही धक्का लागत नाही. अगदी कायदेशीरपणे सगळ्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून ही जमीन सरकार ताब्यात घेऊ शकते. आजही गोदरेजसारख्या कंपनीकडे शेकडो एकर जमीन पडून आहे. ज्याप्रमाणे एखाद्या सरकारी प्रकल्पाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात, त्याचप्रमाणे उद्योजकांच्या या जमिनीसुध्दा सरकारी गृहनिर्माण प्रकल्पाकरिता का ताब्यात घेत नाही. या जमिनीवर हेच उद्योगपती मोठमोठे टॉवर्स बांधून त्यांची भरमसाठ किंमतीने विक्री करत आहेत आणि अब्जावधींचा नफा कमवित आहेत. सरकारला या गोष्टी माहित असूनही त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते. पूर्व उपनगरात गोदरेजतर्फे एकेक प्लान्ट बंद करून टॉवर उभे करण्याचे घाट घातले जात आहेत. ही सगळी सरकारची सामान्य माणसाला सापत्न वागणूक देण्याची भूमिका पाहिल्यानंतर बड्या धेंडांसाठी झटणारे सरकार स्वस्तातली घरे देऊच शकणार नाही. फक्त अफवाच उठवू शकेल. मंत्रालयात स्वस्त घरांच्या अर्जांची विक्री म्हणजे एका अर्थी सरकारी पातळीवरून अफवेचीच विक्री केली गेली आणि सरकारने केलेली सारवासारव हीसुध्दा लोकांची दिशाभूलच होती. निवारा समाजाची मूलभूत गरज आहे. सरकार ती पूर्ण करू शकत नाही. सामान्य माणसाला परवडणारे घर देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती कितीही लपवली तरी लपू शकत नाही.